जा क्र मसके/वाकवली/प्रअवा/ 110 /२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली, जि.रत्नागिरी.
दिनांक : 19 MAY 2022

प्रती,

मा.प्रभारी अधिकारी,
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**विषय : आंबा कलमे बांधणी व संगोपण करणे हे काम ठेका पध्दतीने करण्याच्या जाहीरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर (www.dbskkv.org) प्रसिध्दी देणे बाबत...**

महाशय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली या केंद्राच्या “वाकवली विभाग” या प्रक्षेत्रावर आंबा कलमे बांधणी व संगोपण करणे हे काम ठेका पध्दतीने करावयाचे आहे. तरी याबाबतची प्रसिध्दी विद्यापीठ संकेतस्थळावर **(www. dbskkv.org)** करणेस विनंती आहे.

**सोबतः—** प्रसिध्दी नमूना जोडणेत येत आहे.

आपला विश्वासू,

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी

Scanned by CamScanner

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली. ता.दापोली, जि.रत्नागिरी.

जा.क्र/मसंकें/प्रअवा/१११ /२०२२.                    दिनांक 19 MAY 2022

## जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग प्रक्षेत्राला मा. संशोधन संचालक महोदय, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली यांनी येत्या सन २०२२–२३ या आर्थिक वर्षात (हापुस– १०,०००, केसर– १२,०००, रत्ना– १०००, सिंधू–५००, इतर– ३,००० नग) असे एकुण २६,५०० नग आंबा कलमांचे उद्दिष्ट दिलेले आहे. आंबा कलमे बांधणी नंतर विक्री योग्य आंबा कलमे मिळण्याचे प्रमाण ५०% गृहित धरून २६,५०० नग विक्री योग्य आंबा कलमे मिळण्यासाठी साधारण ५३,००० नग आंबा कलमे बांधणे आवश्यक आहेत. आंबा कलमे बांधणी व संगोपण करणे व त्याअनुषंगाने करावयाच्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | कामांचा तपशिल<br>(७ जुन २०२२ ते १५ जुन २०२३) |
|---|---|
| १) | नर्सरीत शेडची दुरूस्ती काम करणे व शेडवर सिल्पॉलिन टाकणे. ( १६शेड ) |
| २) | आंबा कलमांसाठी ६X८ च्या पिशव्या भरणे व सदर पिशव्या शेडमध्ये लावून घेणे. (५३,०००नग) |
| ३) | आंबा बाटा वाफ्यावर पेरणीचे काम करणे. (७ टन सालविरहीत बाटा) |
| ४) | बाटा रूजून आल्यानंतर वाफ्यावरून बाटा काढणे व त्यानंतर बावीस्टीनच्या पाण्यातुन धुवून काढणे. |
| ५) | आंबा अंकूर काड्या काढण्याचे काम करणे. (५३,०००नग) |
| ६) | आंबा कलमे बांधणी काम करणे. (५३,०००नग) |
| ७) | बांधणी केलेली कलमे पिशवीत लावणे व पाणी घालणे. |
| ८) | आंबा कलमांना पाणी घालणे, C. O. C. चे ड्रेन्चींग काम करणे. |
| ९) | बांधणी केलेल्या आंबा कलमांची माहे जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या महिन्यात फूट काढणे, पिशवीतील गवत काढणे, आंबा कलमांना किटकनाशक/ बुरशीनाशक, सुक्ष्म अन्नद्रव्ये यांची फवारणी काम करणे, बांधणीतून शिल्लक राहिलेल्या आंबा बाटा रोपांचे संगोपण करणे. |
| १०) | फुटलेली आंबा कलमे चरात लावण्यासाठी चर मारणे, व आंबा कलमे चरात लावून घेणे. |
| ११) | पावसाळयानंतर शेडवर ग्रीननेट टाकणे |
| १२) | दिलेल्या उद्दिष्टानुसार जुन, जुलै मध्ये आंबा कलमे बांधणीचे काम पुर्ण न झाल्यास उपलब्ध असलेल्या आंबा बाटा रोपांवर ऑक्टोंबर, फेब्रुवारी मध्ये आंबा फुटण्यासाठीच्या पोषक वातावरणात शेंडा कलमे बांधणे. |
| १३) | नर्सरीत आजूबाजूचा परिसर तणविरहित ठेवणे व त्यासाठी बेणनी, तणनाशक मारणे. |
| १४) | चरात टाकलेल्या आंबा कलमांची माहे ऑक्टोंबर २०२२ ते १५ जून २०२३ पर्यंत देखभाल करणे. (पाणी घालणे, गवत काढणे, खताची मात्रा देणे,किटकनाशक/बुरशीनाशक यांची गरजेनुसार फवारणी करणे त्याचप्रमाणे आयत्यावेळी उदभवणारी कामे करणे) |

वरीलप्रमाणे कामे ठेका पध्दतीने दिनांक ०७/०६/२०२२ ते १५/०६/२०२३ या कालावधीत करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिति तसेच भरून दयावयाचे संमतीपत्र आणि

(कृपया मागील पानावर पहावे) PTO

Scanned by CamScanner

दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी दरपत्रकामध्ये होणा-या मजूरीच्या एकुण रकमेचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमुना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक : ०२/०६/२०२२ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"वाकवली विभाग अंतर्गत आंबा कलमे बांधणी व संगोपण हे काम ठेका पध्दतीने करणे."** असा उल्लेख करावा, लिफाफा बंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (वाकवली विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून संमतीपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमुन्यामध्येच सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रकाचा नमुना सोबत जोडण्यात येत आहे.

- **उपरोक्त कामाच्या अटी व शर्ती:—**

१ ठेकेदाराने दरपत्रक सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरुप पाहूनच दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.

२ ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/ विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे. ज्याचे दरपत्रक सर्वात कमी आहे. त्यांना कामाचा आदेश दिल्यानंतर त्यांनी अनामत रक्कम म्हणून रू.५000/- (रू.पाच हजार मात्र) या रक्कमेचा धनाकर्ष **(D.D.)** " डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली" या नांवे 'आरडीसीसी बँक शाखा वाकवली येथे देय' काढावा. दरपत्रकासोबत पॅनकार्ड व आधारकार्डची छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.

३ आंबा बडस्टीक या प्रक्षेत्राच्या झाडांवरून स्व:त काढून आंबा कलमे वांधावयाची आहेत आणि आंबा कलमे बाधणीनंतर माहे १५ जून २०२३ पर्यंत आंबा कलमांचे संगोपण करून १५ जुन २०२३ अखेरीस विक्रीयोग्य आंबा कलमे मोजून विभागाचे ताव्यात दयावयाची आहेत.

४ आंबा कलमे बांधणीच्या बिलाचा

**a.** पहीला हप्ता :— कामाच्या तपशिलातील कामांपैकी अ.क्र. १ ते २ ही कामे केल्यानंतर दरपत्रकातील नमुद दरानुसार अदा करणेत येईल.

**b.** दुसरा हप्ता:— कामाच्या तपशिलातील कामांपैकी अ.क्र. ३ ते ७ ही कामे केल्यानंतर दरपत्रकातील नमुद दरानुसार अदा करणेत येईल.

**c.** तिसरा हप्ता:— कामाच्या तपशिलातील कामांपैकी अ.क्र. ८ ते १० ही कामे केल्यानंतर दरपत्रकातील नमुद दरानुसार अदा करणेत येईल.

**d.** चौथा हप्ता कामाच्या तपशिलातील कामांपैकी अ.क्र. ११ ते १३ ही कामे केल्यानंतर दरपत्रकातील नमुद दरानुसार अदा करणेत येईल.

**e.** पाचवा हप्ता कामाच्या तपशिलातील कामांपैकी अ.क्र. १४ मधील कामे माहे ऑक्टोंबर २०२२ ते माहे फेब्रुवारी २०२३ पर्यंत केलेल्या कामाच्या दरपत्रकातील नमुद दरानुसार अदा करणेत येईल.

**f.** सहावा हप्ता हा कामाच्या तपशिलातील कामांपैकी अ.क्र. १४ मधील कामे माहे मार्च २०२३ ते १५ जुन २०२३ पर्यंत केलेल्या कामाच्या दरपत्रकातील नमुद दरानुसार तसेच विक्रियोग्य आंबा कलमे विभागाचे ताब्यात दिलेवर अंतीम बिलातुन मागील देय्यकांचे हप्ते वजा करून अंतीम देय्यक आदा करणेत येईल.

५ आंबा कलमे जगण्याचे प्रमाण ५0 %गृहीत धरूनच आपणास निविष्ठा पुरविण्यात येतील. आंबा कलमे यशस्वी होण्याचे प्रमाण ५0 % पेक्षा कमी आल्यास कमी असलेल्या कलमांची वसुली अंदाजपत्रकातील प्रती कलमांच्या दरानुसार एक तृतियांश म्हणजे प्रती कलम रू.१0.00 पै. प्रती नग याप्रमाणे अंतिम बिलामधून अथवा अनामत रकमेतून वसूल करणेत येईल.

Scanned by CamScanner

६. बांधलेल्या आंबा कलमांना जर का वातावरण पोषक मिळाले तर आंबा कलमे ५०% पेक्षा जास्त मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब आंबा कलमे ताब्यात घेण्याच्या वेळी जर का आंबा कलमे २६,५०० पेक्षा जास्त मिळाली तर जास्त मिळालेल्या कलमांच्या देयकासाठी प्रति कलम रूपये १५.०० याप्रमाणे वाढीव मंजुरी घेवून सदर बिलाची अदायगी करण्यात येईल.

७. प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधित कार्यालयामार्फत केला जाईल. पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधितांकडे जमा करावयाचे आहे.

८ ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या उर्वरीत बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबंधित ठेकेदाराचे दरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्यावेळी ग्राह्य धरले जाणार नाही. कलमांबाबत दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत रद्द केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

९ ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बॅंक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्याचे बॅंक खाती **N.E.F.T./R.T.G.S.** धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.

१० ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्या संबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

११ ठेक्याच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/मजूरांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान/चोरीझाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किंमत वसुल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल व त्याबाबतच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही.

१२ ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

१३ सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक **SLP-5443/90** नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेका कालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

१४ ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरुपात रू.१००/- च्या बॉंड पेपरवर करणे बंधनकारक राहील. कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

१५. प्रचलित पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातुन आयकर कपात करण्यात येईल.

सोबत:—दरपत्रक मसुदा

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
ता.दापोली,जि.रत्नागिरी

प्रत माहितीसाठी सादर...

१ नोटिस बोर्ड मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
२ नोटिस बोर्ड भासुयो/कंदपिके मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.
३ ग्रामपंचायत वाकवली/इनामपांगारी/टेटवली/सुखदर/कुंभवे,ता.दापोली/खेड

Scanned by CamScanner

श्री / श्रीमती . ____________________

मु . पो . ______________ ता . ________

जि . रत्नागिरी .

दि .

प्रति .

मा . संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली .
(वाकवली विभाग)

**विषय ः वाकवली प्रक्षेत्रावरील नर्सरीत आंबा कलमे बांधणी व संगोपण हे काम ठेका पध्दतीने करण्याच्या दरपत्रकाबाबत.....**

महाशय,

वरील विषयान्वये मी आपणास कळवू इच्छिते/इच्छितो की, मी आपल्या मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली प्रक्षेत्रामधील नर्सरीत आंबा कलमे बांधणी व संगोपण हे काम ठेका पध्दतीने करण्याची जाहिरात मी पाहिली असून सदर जाहिरातीस अधिन राहुन वाकवली विभागातील आंबा कलमे बांधणी व संगोपण करून २६,५०० नग विक्री योग्य कलमे तयार करून देणे. हे काम दिनांक ०७/०६/२०२२ पासुन १५/०६/२०२३ या कालावधीत आपल्या अधिका-यांच्या सुचनेनुसार आपल्या अटी/शर्तीस अधीन राहून करावयास तयार आहे . मी प्रक्षेत्रावरील कामाचे स्वरूप प्रत्यक्ष पाहीले आहे . सदर कामांसाठी मी खालील प्रमाणे दर सादर करीत आहे .

| अ.क्र. | कामाचा तपशिल | आवश्यक परिमाण व मजुर युनिट | प्रति नग दर व युनिट दर | मजुरी खर्च रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १) | नर्सरीत शेडची दुरूस्ती काम करणे व शेडवर सिल्पॉलिन टाकणे. ( १६शेड ) | | | |
| २) | आंबा कलमांसाठी ६X८ च्या पिशव्या भरणे व सदर पिशव्या शेडमध्ये लावून घेणे. (५३,०००नग) | | | |
| ३) | आंबा बाटा वाफ्यावर पेरणीचे काम करणे. (७ टन सालविरहीत बाटा) | | | |
| ४) | बाटा रूजून आल्यानंतर वाफ्यावरून बाटा काढणे व त्यानंतर बावीस्टीनच्या पाण्यातुन धुवून काढणे. | | | |
| ५) | आंबा अंकूर काड्या काढण्याचे काम करणे. (५३,०००नग) | | | |
| ६) | आंबा कलमे बांधणी काम करणे. (५३,०००नग) | | | |
| ७) | बांधणी केलेली कलमे पिशवीत लावणे व पाणी घालणे. | | | |
| ८) | आंबा कलमांना पाणी घालणे, C. O. C. चे ड्रेन्चींग काम करणे. | | | |
| ९) | बांधणी केलेल्या आंबा कलमांची माहे जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या महिन्यात फूट काढणे, पिशवीतील गवत काढणे, आंबा कलमांना किटकनाशक/ बुरशीनाशक, सुक्ष्म अन्नद्रव्ये यांची फवारणी काम करणे, बांधणीतून शिल्लक राहिलेल्या आंबा बाटा रोपांचे संगोपण करणे. | | | |
| १०) | फुटलेली आंबा कलमे चरात लावण्यासाठी चर मारणे, व आंबा कलमे चरात लावून घेणे. | | | |
| ११) | पावसाळयानंतर शेडवर ग्रीननेट टाकणे | | | |
| १२) | दिलेल्या उद्दिष्टानुसार जुन, जुलै मध्ये आंबा कलमे बांधणीचे काम पुर्ण न झाल्यास उपलब्ध असलेल्या आंबा बाटा रोपांवर ऑक्टोबर, फेब्रुवारी मध्ये आंबा फुटण्यासाठीच्या पोषक वातावरणात शेंडा कलमे बांधणे. | | | |
| १३) | नर्सरीत आजूबाजूचा परिसर तणविरहित ठेवणे व त्यासाठी बेणनी, तणनाशक मारणे. | | | |
| १४) | चरात टाकलेल्या आंबा कलमांची माहे ऑक्टोबर २०२२ ते १५ जून २०२३ पर्यंत देखभाल करणे. (पाणी घालणे, गवत काढणे, खताची मात्रा देणे,किटकनाशक/बुरशीनाशक यांची गरजेनुसार फवारणी करणे त्याचप्रमाणे आयत्यावेळी उदभवणारी कामे करणे) | | | |
| | | एकुण | | |

(PTO)

Scanned by CamScanner

मागील संदर्भानुसार जाहिरातीमधील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. सर्व अटी अ.क्र. ०१ ते १५ नुसार काम करण्यास मी तयार आहे. तरी माझे दरपत्रक मंजूर करून मला संबंधित कामाचा ठेका मिळावा ही विनंती.

**सोबत:– आधारकार्ड व पॅनकार्डची छायांकित प्रत.**

आपला विश्वासू

दिनांक:–

ठिकाण:–

स्वाक्षरी :–

नाव:–

पत्ता:–

भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्र:–

Scanned by CamScanner